महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ २४ डिसेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १७९ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

# राज्यात नवी युती होण्याची शक्यता

## ठाकरे बंधू आणि वंचितला डावलून महाराष्ट्रात होणार नवी युती?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राज्यात सध्या महापालिका निवडणुकीचे वारे वाहत असून युती आणि आघाडीसंदर्भात निर्णय होत आहेत. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांचा मुंबईसह सात महापालिका एकत्र लढण्याचं ठरलं आहे, तर दुसरीकडे भाजपा आणि शिवसेनेतील जागावाटपही अंतिम टप्प्यात आहेत. पुण्यात दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र लढण्याची शक्यता आहे. पण मुंबईत काँग्रेस मात्र एकटी पडताना दिसत आहे. काँग्रेस वंचितसोबत अद्यापही चर्चेत असून, ठाम निर्णय झालेला नाही. मुंबई महापालिका निवडणुकीत 50-50 जागा वाटपावर ठाम असल्याचे वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी स्पष्ट केलं आहे. त्यामुळे युतीच्या चर्चा थांबल्या आहेत.



**महाराष्ट्रात नवी युती होण्याची शक्यता**

संजय राऊत यांनी मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेस आमच्यासोबत असेल असं जाहीर केलं असून, दुसरीकडे वंचित काँग्रेससोबत अद्यापही चर्चा करत आहे. पण यादरम्यान मुंबईत मोठ्या घडामोडी घडत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचं शिष्टमंडळ काँग्रेस काँग्रेसच्या मुंबई अध्यक्षा व खासदार वर्षा गायकवाड यांच्या भेटीसाठी पोहोचलं होतं. यावेळी राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून काँग्रेसला ऑफर देण्यात आली आहे. यासंदर्भात आता उद्या पुन्हा बैठक होणार असून, निर्णय जाहीर होण्याची शक्यता आहे.

महापालिका निवडणुकीसाठी राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून काँग्रेसला 50 जागांसाठीचा प्रस्ताव देण्यात आला आहे. उद्या संध्याकाळी 4 वाजता राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते वर्षा गायकवाड यांची भेट घेणार आहेत. यावेळी पुन्हा एकदा त्यांच्यात बैठक होणार आहे.

**'एकत्र लढलो तर फायदा'**

मुंबई महानगरपालिकेमध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरद पवार गट एकत्र लढलो तर फायदा होईल अशी भूमिका नेत्यांनी मांडली आहे. काँग्रेस नेते आणि शरद पवार यांच्या भेटीनंतर आज राष्ट्रवादीच्या शिष्टमंडळांनी काँग्रेसला तसा प्रस्ताव दिला आहे. या प्रस्तावाच्या संदर्भात उद्या परत कांग्रेस नेते आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते यांची भेट होणार आहे. काँग्रेसची एकीकडे वंचित सोबत बोलणी सुरू असताना दुसरीकडे राष्ट्रवादी शरद पवार गटाचाही प्रस्ताव आल्याने काँग्रेसला आता भूमिका घ्यावी लागणार आहे.

**ठाकरे बंधूंकडून फक्त 15 जागांची ऑफर**

ठाकरे बंधू मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाला केवळ 15 च्या आसपास जागा देत असल्याने त्यांनी काँग्रेससोबत चर्चा सुरु केली आहे. ठाकरे बंधुंसोबत युती करायची असेल तर किमान 25 च्या वर जागा दिल्या जाव्यात, अशी शरद पवार गटाची मागणी आहे.

**काँग्रेसकडून स्टार प्रचारकांची यादी जाहीर**

मुंबई महापालिका निवडणुकीसाठी स्टार प्रचारकांची यादी आज मुंबई काँग्रेसने जाहीर केली आहे. या यादीत अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस व प्रभारी रमेश चेन्निथला, मुंबई काँग्रेस अध्यक्ष खासदार प्रा. वर्षा एकनाथ गायकवाड, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी, विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस खासदार मुकुल वासनिक, ज्येष्ठ नेते व माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी मुख्यमंत्री सुशिलकुमार शिंदे, पृथ्वीराज चव्हाण, माजी मंत्री मोहम्मद आरिफ नसीम खान, राज्यसभा खासदार चंद्रकांत हंडोरे, तेलंगणाचे मंत्री मोहम्मद अझरूद्दीन, काँग्रेसच्या अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष इम्रान प्रताप गढी, विधान परिषदेतील गटनेते सतेज उर्फ बंटी पाटील, माजी मंत्री आमदार अमित देशमुख, डॉ. नितीन राऊत, सुनील केदार, आमदार अस्लम शेख, आमदार अमीन पटेल,आमदार डॉ. ज्योती एकनाथ गायकवाड आमदार अशोक जगताप, माजी मंत्री सुरेश शेट्टी, माजी खासदार प्रिया दत्त, डॉ. अमरजितसिंग मनहास, राष्ट्रीय सचिव व मुंबई काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते सचिन सावंत, गणेशकुमार यादव, सूरजसिंग ठाकूर, माजी आमदार मधु चव्हाण, अशोक जाधव, चरणसिंग सप्रा, जेनेट डिसुझा, प्रवक्ते सुरेशचंद्र राजहंस, मोहसिन हैदर, अशरफ आझमी, ट्युलिप मिरांडा, मुंबई काँग्रेस युवक अध्यक्ष झीनत शबरीन, प्रद्युम यादव, निजामुद्दीन राईन, अवनीश सिंह, सुभाष भालेराव यांचा समावेश आहे.

## महायुती जाहीर झाल्यानंतरच जागावाटपाची घोषणा

### खासदार नरेश म्हस्के यांचे प्रतिपादन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे महापालिका निवडणुकीसाठी महायुतीत जागावाटपाचा कोणताही तिढा नाही. भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) एकत्रितपणे निवडणूक लढवण्यावर शिक्कामोर्तब झाले असून, वरिष्ठांकडून युतीची अधिकृत घोषणा झाल्यानंतरच जागावाटपाचा अंतिम आकडा जाहीर केला जाईल, अशी माहिती खासदार नरेश म्हस्के यांनी दिली. ठाण्यातील टेंभी नाका येथील आनंद आश्रम येथे शिवसेनेकडून इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतींना मंगळवारी सुरुवात झाली. या वेळी माध्यमांशी संवाद साधताना म्हस्के यांनी पक्षाची भूमिका आणि विरोधकांवर जोरदार निशाणा साधला. मुलाखतींच्या प्रक्रियेबाबत माहिती देताना म्हस्के म्हणाले, की सध्या विविध प्रभागांतील इच्छुकांशी संवाद साधला जात आहे. उमेदवार निवडताना त्याचे संघटनात्मक काम, जनसंपर्क आणि मुख्य म्हणजे इलेक्टिव्ह मेरिट (निवडून येण्याची क्षमता) हेच निकष पाळले जातील. युतीचा अंतिम निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार हेच घेतील.

## आरोग्य समिती व कार्यकारी समितीच्या बैठकीत जिल्ह्याच्या आरोग्य यंत्रणेचा सर्वकष आढावा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** जिल्ह्यातील आरोग्य प्रशासन अधिक शिस्तबद्ध, गतिमान व परिणामकारक करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी ठाम भूमिका घेतली असून, दि. २२ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत आरोग्य समितीची बैठक व त्यानंतर कार्यकारी समितीची स्वतंत्र बैठक त्यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

या दोन्ही बैठकींमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्ह्यात आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व योजना, कार्यक्रम, उपलब्ध मनुष्यबळ, भौतिक व वैद्यकीय साधनसामग्री यांचा सखोल, वस्तुनिष्ठ व नियोजनबद्ध आढावा घेतला. जिल्ह्यातील आरोग्य सेवा केवळ आकडेवारीपुरती मर्यादित न राहता प्रत्यक्षात नागरिकांपर्यंत गुणवत्तापूर्ण स्वरूपात पोहोचली पाहिजे, यावर त्यांनी विशेष भर दिला.



यावेळी असंसर्गजन्य आजार नियंत्रण कार्यक्रम, क्षयरोग, हिवताप, कुष्ठरोग, सिकल सेल, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम, कुपोषण निर्मूलन तसेच मोतीबिंदू शस्त्रक्रिया या महत्त्वाच्या आरोग्य कार्यक्रमांचा स्वतंत्रपणे आढावा घेण्यात आला. प्रत्येक कार्यक्रमात उद्दिष्टपूर्तीसाठी काटेकोर नियोजन, अंमलबजावणी व नियमित देखरेख बाबत आवश्यक सुचना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिले.सामान्य नागरिकांना सहज, सुलभ, वेळेत व गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची मूलभूत व सर्वोच्च जबाबदारी असल्याचे स्पष्ट करत, राज्यस्तरावर निश्चित करण्यात आलेल्या आरोग्य निर्देशांकांमध्ये ठाणे जिल्हा कोणत्याही परिस्थितीत मागे राहू नये, यासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जबाबदारीने काम करावे, असे ठामपणे त्यांनी सांगितले.सिकल सेल जनजागृती अभियानाबाबत स्पष्ट व ठोस आदेश राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सिकल सेल जनजागृती अभियान राज्यासह ठाणे जिल्ह्यात दिनांक १५ जानेवारी २०२६ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. या अभियानांतर्गत ० ते ४० वर्षे वयोगटातील नागरिकांची सिकल सेल तपासणी करण्यात येणार असून, या वयोगटातील एकही पात्र लाभार्थी तपासणीपासून वंचित राहणार नाही, याची विशेष दक्षता घेण्याचे स्पष्ट निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिले. जिल्हा सिकलसेलमुक्त करण्याचा ठाम संकल्प व्यक्त करत, या अभियानासाठी काटेकोर नियोजन, क्षेत्रस्तरीय प्रभावी अंमलबजावणी व व्यापक जनजागृती अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. ग्रामपातळीपासून शहरी भागांपर्यंत विविध माध्यमांचा प्रभावी वापर करून अभियानाची माहिती प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचवावी, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या.

**आयुष्मान भारत योजनेअंतर्गत १०० टक्के उद्दिष्ट पूर्ततेचे निर्देश**

बैठकीत एकत्रित आयुष्मान भारत योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना आयुष्मान कार्डचे १०० टक्के वितरण पूर्ण करण्यावर विशेष भर देण्यात आला. एकही पात्र लाभार्थी वंचित राहू नये, यासाठी संबंधित यंत्रणांनी परस्पर समन्वयाने विशेष मोहिम राबवावी, असे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी दिले.या बैठकीस जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दिनेश सुतार, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. स्वाती शिंदे, सहायक संचालक (कुष्ठरोग) डॉ. मनीष रेंगे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. मृणाल राहुड, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी संजय जाधव, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. बालाजी गावडे, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. संतोषी शिंदे, सर्व तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक अमोल बाघ तसेच आरोग्य विभागातील इतर अधिकारी, जिल्हा समन्वयक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## केडीएमसी निवडणूक पार्श्वभूमीवर पहिल्या दिवशी 912 उमेदवारी अर्जांची विक्री



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका 2025-2026 सार्वत्रिक निवडणूक पार्श्वभूमीवर 122 जागांसाठी 31पॅनल च्या माध्यमातून निवडणूक संपन्न होणार आहे. या निवडणूक कार्यक्रम रूपरेषा नुसार 23 डिसेंबर रोजी मनपाच्या 9 आर.ओ. कार्यालयातून निवडणूक इच्छुक उमेदवारांनी तब्बल 912अर्ज विकत घेतले असल्याची निवडणूक विभागाकडून आकडेवारी प्राप्त झाली आहे. यामुळे केडीएमसी निवडणूकीत इच्छुक उमेदवारांची मांदियाळी होणार असल्याचे चित्र यानिमित्ताने दिसत आहे. इच्छुक उमेदवारी अर्ज विक्री प्रस्थापित पक्षांना डोके दुखी होते की, काय आशा खमंग चर्चा यानिमित्ताने रंगल्या आहेत. इच्छुक उमेदवारांची मनधरणी करण्यात प्रस्थापित पक्ष कसा मार्ग काढणार अशा चर्चा राजकीय विश्लेषक, जाणकरांकडून यानिमित्ताने होत असल्याचे चित्र यानिमित्ताने दिसत होते.

## उल्हास नदीतील जलपर्णी रोखण्याचे नवनियुक्त सीईओं समोर आव्हान



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : उल्हास नदीतील बहुचर्चित जलपर्णीचा विषय पत्रकार संजय कांबळे यांनी लावून धरल्याने ठाणे जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी एकत्रित प्रयत्न करुन ही जलपर्णी काढण्यासाठी मशीन बोलावण्यात आल्या ,यावर लाखो रुपये खर्च करण्यात आले होते,, याद्वारे जलपर्णी काढल्यानंतर आता पुन्हा नदीपात्रात जलपर्णी दिसू लागली आहे, त्यामुळे हे काम आम्हांला दिले तर उल्हास नदीपात्र स्वच्छ करु, शिवाय आम्हां स्थानिक मच्छीमारांना रोजगार देखील मिळेल अशी भावना त्यांनी बोलून दाखवली आहे, त्यामुळे सध्याचे ठाणे जिल्हा परिषदेचे नवनियुक्त सीईओं रणजित यादव हे याचा विचार करणार का? अन्यथा ही जलपर्णी रोखणे त्यांच्या समोर आव्हान ठरणार आहे, गेल्या कित्येक वर्षांपासून उल्हास नदीचे पात्र हे जलपर्णीमुळे पुर्णपणे भरून गेले होते. यामुळे पाण्याला उग्र वास येत होता, शिवाय पाण्यातील जलचर व इतर प्राणी मोठ्या प्रमाणात मरत होते, वांरवार तक्रार, निवेदने, दिली परंतु कारवाई काही झाली नाही, या विरोधात काही सामाजिक संघटनानी उपोषण देखील केली होती, तर वरपगावचे पत्रकार संजय कांबळे यांनी हा विषय सातत्याने लावून धरला यांचा परिणाम असा झाला की, ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी या भागाची पाहणी केली, त्यांच्या सोबत प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे मॅडम, डेप्युटी सीईओ अविनाश फडतरे, प्रमोद काळे, गटविकास अधिकारी संजय भोये ग्रामपंचायत अधिकारी हेही उपस्थित होते, यानंतर ही जलपर्णी काढण्यासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ आणि सीईओ यांच्या प्रयत्नांमुळे मशीन नदीपात्र उतरल्या व जलपर्णी काढून काठावर टाकू लागल्या, या टाकलेल्या जलपर्णीचा अंत्यत चांगला उपयोग तत्कालीन सीईओ श्री घुगे यांनी केला, या टाकाऊ जलपर्णी पासून विविध संसार उपयोग वस्तू बनविण्याचे काम महिला बचत गटांना दिले, याकरिता त्यांना वरप येथील जिप शाळेत प्रशिक्षण देण्यात आले. हा प्रयोग संपूर्ण महाराष्ट्रात गाजला, दुर्दैवाने त्यांची बदली झाली आणि आता पुन्हा जलपर्णी ने डोके वर काढले आहे, उल्हास नदीतील आपटी, आणेभिसोळ, रायते, पांजरापोळ, कांबा, पावशेपाडा, वरप, म्हारळ या नदी किनारी जलपर्णी दिसू लागली आहे, ती आताच काढली तर बरे अन्यथा भविष्यात संपूर्ण नदीपात्र पुर्वीप्रमाणे भरून जाऊ शकते. त्यामुळे नदीकाठावरील गाळेगाव, अटाळी, मोहने,मोहिली, मानिवली, वरप, इत्यादी गावातील स्थानिक मच्छीमार मनोहर कोनकर, राकेश सुरेश तरे, दशरथ मुकणे, विनोद सुतार, रोहिदास पाटील, आंबो पवार, निलेश जाधव, राम भोईर, नवनाथ वाघे, गणेश जाधव, नवनाथ तरे, हेंमत तरे, यांनी ही जलपर्णी काढण्याची तयारी दर्शवली आहे, यातून आम्हांला रोजगार मिळेल, आमच्या कुंटूबांचा उदरनिर्वाह चालेल अशी भावना त्यांनी बोलून दाखवली आहे. खरेच जिल्हा परिषदेचे सीईओ रणजित यादव, जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाने हे काम मच्छीमारांना दिले तर नदी ही स्वच्छ राहिल व यांना रोजगार देखील उपलब्ध होईल, याचा विचार करायला काय हरकत नाही.

## भिवंडी महापालिकेच्या रस्ता रुंदीकरणासाठी बुलडोझर चालू देणार नाही : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी:** भिवंडी महानगर पालिकेच्या कार्यक्षेत्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे काम गतीमान पध्दतीने सुरू आहे. त्यासाठी महापालिका प्रशासनाने अंजूरफाटा ते कल्याणनाका दरम्यान रस्ता रूंदीकरण मोहीम राबवून शेकडो इमारती,घर व दुकान तोडली आहेत. पुढे आता कल्याण येथे जाणाऱ्या मेट्रो रेल्वे साठी आणि शहर वाहातूकीसाठी कल्याणनाका ते साईबाबा रस्ता रूंदीकरण करण्यासाठी मोजमाप व मार्कींग करून पोलिस बंदोबस्तात तोडू कारवाई लवकरच करणार आहे. त्यामुळे स्थानिक रहिवाशांनी महापालिकेच्या या कारवाईला कडकडीत विरोधात करीत थेट राज्याचे उपमुख्यमंत्रीतथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन मदत मागितली आहे.त्यामुळे राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल सोमवारी भिवंडीत एका कार्यक्रमात निमित्ताने येऊन कल्याणरोड येथील रहिवाश्यांना मोबदला व त्यांचे पुनर्वसन होत नाही तो पर्यंत तोडू कारवाईचा बुलडोझर चालवू देणार नाही,असा थेट इशारा महापालिका आयुक्त व प्रशासनाला दिला आहे.त्यामुळे महापालिकेच्या तोडू कारवाईला सध्या तरी ब्रेक लागला आहे.शिंदे यांनी दिलेल्या या आश्वासनामुळे कल्याण रोड रहिवासी समाधानी व आनंदी दिसत असुन होणाऱ्या भिवंडी महापालिकेच्या निवडणुकीत शिवसेना पक्षाला याचा फायदा होईल अशी जोरदार चर्चा सुरू झाली आहे.भिवंडी महानगर पालिकेची सार्वत्रिक निवडणूक होणार असल्याने आजपासून प्रचाराची रणधुमाळी सुरु आहे. त्यामुळे टेमघर येथे शिवसेना उपनेते रूपेश म्हात्रे यांच्या शिवसेना पक्ष जनसंपर्क कार्यालयाच्या उद्घाटनासाठी काल सायंकाळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे भिवंडीत आले होते. यावेळी

त्यांच्या सोबत शिवसेना नेते प्रकाश पाटील,ठाणे जिल्हाप्रमुख देवानंद थळे,अरूण पाटील,माजी उपमहापौर मनोज काटेकर,सुभाष माने,संजय म्हात्रे यांच्या सह मान्यवर उपस्थित होते.त्यांनी कल्याणरोड येथील बाधित होणाऱ्या रहिवाश्यांची भेट घेतली. त्यावेळी महापालिका आयुक्त व प्रशासन विकास करण्याच्या नावाखाली बेकायदेशीर रस्ता रुंदीकरण करीत असल्याची माहिती रहिवाश्यांनी पालकमंत्री शिंदे यांना दिली. त्याची गंभीर दखल घेत एकनाथ शिंदे यांनी आपल्या भाषणात नमूद केले कि, शहराचा विकास व प्रकल्प राबविताना मनपा प्रशासनाने नागरिकांचे नुकसान होणार नाही,तसेच विकास ऐवजी भकास होणार नाही,याची काळजी घेणे आवश्यक आहे. कल्याणरोड येथील घरे व दुकाने यांच्या कोणावरही बुलडोझर चालविला जाणार नाही,असे सांगत रहिवाश्यांना योग्य मोबदला देत त्यांचे पुनर्वसन केले जाईल,असा विश्वास त्यांनी रहिवाश्याना दिला.शहर किंवा नगर असो तेथे विकास झाला पाहिजे.पण कोणावर अन्याय होणार नाही,अन्याय होऊ देणार नाही,असे मत एकनाथ शिंदे यांनी मांडून पुनर्वसन केल्याशिवाय बुलडोझर कारवाई करू नये,असा इशारा त्यांनी महापालिका प्रशासनाचे नाव न घेता दिला.

भिवंडी शहरात गेल्या काही महिन्यापासून विविध विकासकामे सुरु आहेत. त्यासाठी अनेक ठिकाणी रस्ता रुंदीकरण केल्याने अनेक रहिवासी व व्यापारी बाधित झाले आहेत तर पुढे देखील रस्ता रुंदीकरणामध्ये शहरातील मालमत्ताधारक व नागरिक बाधित होणार आहेत. त्यांना देखील योग्य मोबदला मिळावा तसेच त्यांचे देखील पुनर्वसन व्हावे,अशी मागणी शहरातील बाधित नागरिकांकडून होत आहे.



दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता
news.thanejeevandeep@gmail.com
पान : ०२
ठाणे ■ बुधवार
२४ डिसेंबर २०२५



# सायबर गुन्हेगारी आणि मोबाईलचा योग्य वापर याबाबत जनजागृती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ग्रामीण शिक्षण संस्था, माजिवडे संचलित इंग्लिश हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यायात वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभ दि.20 डिसेंबर 2025 रोजी कार्यक्रमाचेअध्यक्ष संस्थेचे विश्वस्त सदस्य वामन पाटील व प्रमुख पाहुणे कापूरबावडी पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनीषा भोंगळे आणि ईगल ब्रिगेड फंडेशनचे विश्वनाथ बिवलकर यांचे उपस्थित दिमाखात पार पडला.



स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सामाजिक माध्यमांचा सुरक्षित वापर तसेच सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. सायबर गुन्ह्यांची तात्काळ तक्रार करण्यासाठी पोलीस हेल्पलाईन 112 आणि सायबर हेल्पलाईन 1930 यांची माहिती देत विद्यार्थ्यांनी स्वतः सजग राहून समाजातही जनजागृती करावी असे आवाहन कापूरबावडी पोलीस स्टेशनद्वारे करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे, विश्वस्त अध्यक्ष मधुकर पाटील, कार्यकारी अध्यक्ष संदेश पाटील, सचिव दीनानाथ ठोमरे, खजिनदार पराग मुलुंडकर, मुख्याध्यापिका वर्षा देसाई, उपप्राचार्य शरदचंद्र भदाणे, मारूती उघाडे, नामदेव भोये, पर्यवेक्षक दत्तात्रय पुकळे यांचे हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमास माजी विद्यार्थी अमित फलके, विद्यार्थी प्रतिनिधी आर्शियाबानो शेख आणि साहिल आढाव सह पालक उपस्थित होते. ज्येष्ठ शिक्षिका प्राजक्ता मेथेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर प्रकाश भोसले यांनी मान्यवरांचे आभार मानले.

# खारेपाटाने उपोषणातून मिळविलेले सिंचनाचे पाणी समाजकंटकांनी रोखलेला श्वास : सी.आर.म्हात्रे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** पेण तालुक्यातील वाशी खारेपाट विभागाला पाणी जाणीवपूर्वक मिळू नये यामागे केवळ तांत्रिक अडचणी नसून अदृश्य पण प्रभावी शक्तीचा संगनमताने चाललेला खेळ आहे.हे चित्र सातत्याने दिसते का?या मागचे अनाकलनीय उत्तर अनेक थरात दडलेले आहे.अशी खंत पेण वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी आर म्हात्रे यांनी व्यक्त केली.

शेती उद्वस्त करून त्या जमिनीवर जमीनदारांचा ,राजकारण्यांचा डोळा. खारेपाट विभाग म्हणजे रायगड मधील भाताचे कोठार,पण लहरी पाऊसाने कठीण समय येत आहे.सिंचनाचे पाणी नसेल तर ही शेती टिकेल कशी? पाणी न मिळाल्याने दुबार पीक घेता येत नाही. शेतकरी हतबल झाला आहे,शेती विकण्याची मानसिकता वाढत आहे असेही त्यांनी सांगितले.बिल्डर,उद्योग, सेझ,लॉजिस्टिक्स,पार्क,नैना MMRDA, यांच्यासाठी मार्ग मोकळा होत आहे असं तर होत नाही ना अशी शंकाही उपस्थित केली.

खारेपाटाला पाणी दिले तर शेती दुबार पिकेल,शेती पिकली तर स्वस्त भावात शेती विकत मिळणार नाही हीच खरी अडचण आहे का असा प्रश्न पडतो. विकास आणि शेती नियोजित संघर्ष आहे. शेतीस पाणी दिलेतर शेतीला बळ मिळेल,स्थलांतरथांबेल,शेतकरी स्वावलंबी बनेल,पण काहींच्या मते स्वावलंबी शेतकरी म्हणजे अडथळा म्हणूनच,विकासाच्या नावाखाली कालवे अपूर्ण,pump हाउस रखडले,निधी मिळूनही काम नाही.योजना कागदावरच,ही निष्क्रियता अपघाती नाहीच,तर हा कट आहे असा आरोपही केला आहे.त्यामुळे राजकीय सोयीस्कर शांतता आहे. राजकारणी नागरिकांचा उपयोग फक्त मतदानापुरता करतात,जर पाणी प्रश्न सुटला तर जनता आपल्या पायरीवर येणार नाही मग आमची राजकीय दुकाने कायमची बंद होतील,हा पाणी न मिळणे या मागचा हेतू असेल. हे ही सांगितले.पाणी व्यवसाय हा राजकीय वर्गात विखुरलेला दिसतोय,पाणी नाही शेतीला,प्यायला त्यामुळे दिवसेंदिवस टँकर लॉबी वाढत आहे.जर सिंचनाचे पाणी मिळाले तर हे टँकर माफिया तोट्यात जातील.म्हणूनच पाणी अडविणे हा डाव आहे का असा गहन प्रश्न येथील नागरिकांना पडला आहे.प्रशासनाची उदासीनता,ही हेतूपुरस्कर की दबावतंत्र, असावे शेवटी अदृष्य शक्ती घातक आहे.निधी आहे पण काम बंद ,फाइल ठप्प,अहवाल हालचाल बंद, वरून आदेश नसतात,खालून हालचाल नाही,यात मात्र चातकाप्रमाणे पाण्याची वाट पाहणारा सामान्य शेतकरी भरडला जातोय. एकंदरीत खारेपाट विभागात पाणी न मिळणे हा नैसर्गिक दोष नाही, तांत्रिक अडचणी नाहीत तर हे मानवनिर्मित षडयंत्र आहे का? अशी शंका व्यक्त केली.शेती नष्ट करण्याची, जमीन हस्तगत करण्यासाठी,पाणी व्यवसाय वाढविण्यासाठी सोय आहे.हे विकास नावाच्या मुखवट्या खाली दडले आहे. पाणी म्हणजे जीवन सिंचनाचे पाणी रोखणे म्हणजे संपूर्ण परिसराचा श्वास रोखणे होय. सिंचनासाठीचा निधी मिळवणे ही भीक नाही तर दोन उपोषण यांच्या अग्नीतून, त्यागातून,आणि संपूर्ण जनतेच्या संघर्षातून मिळवलेला हक्क आहे.आणि अदृष्य शक्तीच्या हस्तकांनी जो पाणी रोखण्यासाठीचा केविलवाणा प्रयत्न हा शेतकऱ्यांच्या जीवावर घातलेला घाव आहे.उपोषण खोटे नव्हते,निधी कागदावर नव्हता,तर जनता रस्त्यावर उतरली,श्रद्धांजली वाहिली, आरोग्य धोक्यात घातले,प्रशासन ,मंत्री ,मुख्यमंत्री यांना योग्यवेळी निधी मंजूर करावे लागले तब्बल ७६६ कोटी त्याच काय?काम सुरू झाले,वास्तविक त्याच कालव्यातून पाइप टाकून योजना पूर्ण होत आहे. मग अडचण का? जर सरकारी कामात अडथळा येत असेल तर तीर्थ प्रसादाची सोय आहेच.ती खात्री खारेपाटात निर्दोष झालेल्या संघर्ष योद्यांना आहेच. मग यांच्यावर तोच प्रयोग झाला पाहिजे .

पाणी अडविणारे कोण? खारेपाटात आपले सगेसोयरे आहेत,ते तडफडत आहेत,त्यांना पाणी मिळाले तर ते सुखी होतील,ही खंत तर नाहीना. खारेपाट निर्जीव ,शेती नष्ट करण्याचा हा प्रयत्न आहे.राजकारणी,जमीनदार,उद्योजक, टँकर लॉबी,हे एकत्रितपणे खारेपाट पाण्यापासून वंचित करण्यात हातभार तर लावीत असावेत अशी शंका येते.

प्रशासनाचे मौन बरेच काय सांगून जाते, गेल साठीचे पोलिस बंदोबस्त याचा वापर पाणी अडविणाऱ्यांच्या मागे लावला पाहिजे.हा प्रश्न फक्त पाण्याचा नसून लोकशाहीचा आहे.उपोषणातून मिळविलेले पाणी काही मूठभर लोक अडविताना,दिसतात हीच दडपशाही वाढेल,आज पाणी अडविले,उद्या सर्व खारेपाट उध्वस्त करणाऱ्या शक्तीला संजीवनी देतील.उपोषणात रस्त्यावर उतरणारी जनता शांत नाही तर एक दिवस मोठा उद्रेक करणारी ठरेल.पाणी अडविणारी शक्ती कोणती हे शोधून आमचे पाणी आम्हाला मिळो,आणि सर्व जनता सुखी राहो,हीच सरकारी यंत्रणेला विनंती असे जाहीर आवाहन सामाजिक कार्यकर्ते सी आर म्हात्रे यांनी केले आहे.

# बी. के. बिर्ला महाविद्यालयात एम पॉवर युथोपियाचे आयोजन



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** बी. के. बिर्ला महाविद्यालयात आयोजित आंतरमहाविद्यालयीन महोत्सव 'बिर्लोत्सव' अंतर्गत, आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या एम.पॉवर या उपक्रमाच्या सहकार्याने 'एमपॉवर युथोपिया' चे आयोजन करण्यात आले होते. तरुणांमध्ये मानसिक आरोग्य, जागरूकता, संवाद आणि सहकार्याला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने या दोन दिवसीय महोत्सवात मुंबई आणि परिसरातील महाविद्यालयांमधील ६००० हून अधिक विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग नोंदवला.

एमपॉवर आणि आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या संस्थापक आणि अध्यक्षा नीरजा बिर्ला या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या उपस्थित होत्या. महाविद्यालयाच्या परिसरात उभारण्यात आलेल्या विशेष मानसिक आरोग्य संस्थानाचे उदघाटन त्यांनी केले. ही स्थापना विद्यार्थ्यांसाठी मानसिक आरोग्य, सहानुभूती आणि मदतीची उपलब्धता याबद्दल संवेदनशीलता वाढवण्यासाठी एक कायमस्वरूपी हक्काचे व्यासपीठ म्हणून काम करेल. एमपॉवर युथोपिया अंतर्गत, ९०० हून अधिक विद्यार्थ्यांच्या सहभागासह विद्यार्थ्यांनी चालवलेल्या सर्वात मोठ्या 'मूड परेड' साठी अधिकृत जागतिक विक्रम संघटनेसमोर जागतिक विक्रम करण्याचा प्रयत्न केला जाईल.

हा कार्यक्रम अधिक चैतन्यदायी बनवण्यासाठी, बिर्लोत्स्सवाच्या मंचावर लोकप्रिय भारतीय बॉय बँड 9 टीनच्या विशेष सादरीकरणाचेही आयोजन करण्यात आले होते, ज्याने संगीत आणि सर्जनशीलतेच्या माध्यमातून आशा, सक्षमीकरण आणि मानसिक मनोधैर्य यांचा संदेश दिला. प्राचार्य डॉ अविनाश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या महोत्सवाच्या सर्व उपप्राचार्य, सांस्कृतिक विभाग प्रमुख, सर्व प्राध्यापक, विद्यार्थी संसद परिश्रम घेत आहेत.

# सुप्रसिद्ध प्राची पाटील व बॉलीवूड स्टंट डायरेक्ट चिता शेट्टी जीवनदीपच्या वार्षिक स्नेहसंमेलन लावणारा हजेरी





दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**गोवेली :** जीवनदीप महाविद्यालय आपल्या शैक्षणिक वर्षात अनेक विद्यार्थी उपयोगी , समाज उपयोगी कार्यक्रम राबवत असते. त्यामध्ये विशेष कार्य करणारे कला, क्रीडा मध्ये आपले यश संपादन करणारे अनेक विद्यार्थी, मान्यवर यांचा सत्कार सोहळा तसेच सांस्कृतिक कार्यक्रम हे बुधवार दिनांक २४- १२- २०२५ रोजी जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे पार पडणार आहे. या वार्षिक स्नेहसंमेलनाला प्रमुख अतिथी. मुरबाड विधानसभा आमदार किसन कथोरे, डॉ. प्रफुल्ल विशे (वरिष्ठ व्यवस्थापक आरोग्य सेवा विभाग हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन) अतुल झेंडे (पोलीस उपयुक्त ठाणे ) रामदास कोकरे (उपायुक्त कल्याण डोंबिवली महानगरपालिका) पंकज गिरी (पोलीस निरीक्षक मांडा टिटवाळा), चिंता शिट्टी तसेच सुप्रसिद्ध मुरबाडीन बाई प्राची पाटील यांची विशेष उपस्थिती या स्नेहसंमेलन प्रसंगी पहावयास मिळणार आहे; विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचा नजराणा , पारितोषिक वितरण समारंभ हा दिनांक २४- १२- २०२५ रोजी होणार आहे. जीवनदीप संस्थेचे अध्यक्ष. रविंद्र घोडविंदे, संचालक. प्रशांत घोडविंदे , प्राचार्य. डॉ. अशोक वाघ, उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे हे या कार्यक्रम प्रसंगी स्वागतासाठी उत्सुक आहेत.

# प्रा. प्रमोद गायकवाड यांना पत्रकारितेत पीएच.डी. प्रदान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** प्रा.प्रमोद गायकवाड यांना मास कम्युनिकेशन आणि पत्रकारितेत पीएच.डी. प्रदान करण्यात आली आहे. त्यांचा VIVA २० डिसेंबर २०२५ रोजी जयपूर येथील एका विद्यापीठात यशस्वीपणे पार पडले. त्यांच्या शोधनिबंधाचे शीर्षक "ग्रामीण आणि शहरी भागातील हायस्कूलच्या मुलांच्या सामाजिक वर्तनावर दूरचित्रवाणीचा प्रभाव" यावर त्यांचा संशोधन अभ्यास आहे. त्यांचे मार्गदर्शक डॉ. बलजीत सिंग होते. डॉ. प्रमोद सध्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशन, अमरावती येथे साहाय्यक प्राध्यापक म्हणून



कार्यरत आहेत. डॉ. गायकवाड यांची शैक्षणिक पार्श्वभूमीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर येथून मास कम्युनिकेशन आणि पत्रकारितेत एम.फिल. केले. त्यांनी पहिल्याच प्रयत्नात नेट उत्तीर्ण केले. डॉ. गायकवाड यांचा ३ वर्षांचा व्यावसायिक अनुभव आहे. त्यांना १४ वर्षांचा अध्यापनाचा अनुभव आहे. त्यांनी एकूण १० पुस्तके प्रकाशित केली आहेत. डॉ. गायकवाड यांना २ पेटंट्स मिळाले आहेत. त्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय शोध परिषदांमध्ये अनेक लेख सादर केले आणि जर्नल्समध्ये प्रकाशित केले आहेत. त्यांना पीएच.डी. प्रदान झाल्याबद्दल त्यांचे पिता अर्जुन आणि माता बेबीनंदा गायकवाड, पत्नी साधना, मुली आकांक्षा, सानवी, त्यांचे बंधू ॲड. प्रणिल, मित्र, नातेवाईक, तसेच डॉ. प्रमोद यांनी यापुर्वी शिकवलेल्या सर्व महाविद्यालयांच्या विद्यार्थी, शिक्षक व प्राचार्यांकडून त्यांचे व्यापक अभिनंदन होत आहे.

# 'हाल ते जेजुरी' पालखी सोहळ्याचे आयोजन!



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण(नरेंद्र पाटील)**


समाज रत्न शाम महाराज भाकरे यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेला 'हाल ते क्षेत्र जेजुरी' पालखी सोहळा यंदा मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. येत्या २६ डिसेंबर रोजी या पालखीचे वासिंद जवळील 'हाल' येथून प्रस्थान होणार असून, या सोहळ्याचे हे यंदाचे १४ वे वर्ष आहे.

सात दिवसांचा भक्तिमय प्रवास जेजुरीच्या खंडोबाच्या दर्शनासाठी निघालेल्या या पालखी सोहळ्याचा प्रवास आठ दिवसांचा असणार आहे. या आठही दिवसांच्या प्रवासात वारकऱ्यांची कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी विशेष काळजी घेण्यात आली आहे.

आठही दिवस दुपारचे आणि रात्रीचे जेवण, तसेच निवासाची उत्तम व्यवस्था आयोजकांकडून करण्यात आली आहे.

अध्यात्मिक कार्यक्रमांची रेलचेल पालखी सोहळयादरम्यान केवळ पायी प्रवासच नव्हे, तर ठिकठिकाणी मुक्कामाच्या ठिकाणी विविध अध्यात्मिक कार्यक्रम, भजन आणि कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. यामुळे संपूर्ण मार्ग भक्तीच्या रंगात न्हाऊन निघणार आहे व भक्तांना मोठ्या प्रमाणात आध्यात्मिक श्रवण सुखाची मोठी पर्वणी मिळणार आहे आयोजन आणि सहकार्य या भव्य सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी शाम महाराज भाकरे यांच्यासोबत तालुक्यातील अनेक मान्यवर आणि वारकरी विशेष परिश्रम घेत आहेत. यामध्ये प्रामुख्याने बाळाराम तारमळे, भरत भोईर, राहुल पाटील सुनील पाटील, बाळा भाकरे, शिवाजी जाधव, गणपत महाराज बोंबे, संतोष काठोले, बाळूमामा भोईर, संतोष निमसे, रुपेश टोके, मनीष भोईर, हेमंत मोरे (देवा ग्रुप महाराष्ट्र राज्य सचिव) मधुकर पितांबरे अक्षय ठकेकर संतोष पाटील निलेश सुतार दत्ता पालेकर सह प्रसिद्ध प्रमुख ज्येष्ठ पत्रकार भगवान फंडें राम भाकरे पंकज पाटील नेवा पाटील हेमंत पाटील बाळाराम टोके नारायण तारमळे, प्रकाश तारमळे, जगदीश भोईर हे सर्व वारकरी योगेश गायकर संतोष भोईर, परेश शेलार, निलेश टेंभे, दिलीप म्हसकर देविदास पाटील, दयानंद जाधव दत्तात्रेय जाधव तसेच सहसचिव ज्ञानेश्वर आहे तरे हे सर्व वारकरी आणि कार्यकर्ते सोहळ्याच्या नियोजनासाठी दिवसरात्र मेहनत घेत आहेत. "गेल्या १४ वर्षांपासून सुरू असलेला हा भक्तीचा वारसा यंदाही तितक्याच श्रद्धेने पुढे नेला जात आहे. भाविकांनी या सोहळयात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# कचऱ्यात आढळले मृत नवजात अर्भक



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** पश्चिमेकडील रेतीबंदर रोडवरील केडीएमसीच्या शाळा क्रमांक २० लोकमान्य टिळक शाळेसमोरील साचलेल्या कचऱ्यात स्त्री जातीचे नवजात अर्भक मृतावस्थेत आढळले. याप्रकरणी विष्णूनगर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे. एका पिशवीत भरून कचऱ्यात टाकलेले मृतावस्थेतील अर्भक कुत्र्याने उचलले आणि एका सोसायटीच्या गेटसमोर आणून ठेवले.



रुणवाल गार्डन मधील. मोठा समूह भाजपात..भाजपा प्रदेशअध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत प्रवेश देशाचा विकास, महाराष्ट्र राज्याचा विकास आणि कल्याण डोंबिवलीचा होत असलेला विकास पाहुन भाजपात प्रवेश केल्याचे विकी हिंगे यांनी सांगितले.

# माजी नगरसेविका सुनिता खंडागळे यांचा राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचा राजीनामा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली असून सत्तधारी शिवसेना आणि भाजपा या पक्षांमध्ये जाण्यासाठी इच्छुक उमेदवरांचा कल पाहायला मिळत आहे. अशातच भारतीय जनता पार्टीतून निवडून आलेल्या आणि नंतर राष्ट्रवादी शरद पवार पक्षात प्रवेश केलेल्या माजी नगरसेविका सुनिता खंडागळे यांनी राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचा राजीनाम दिलं आहे. राष्ट्रवादीच्या प्रदेश



अध्यक्षांकडे त्यांनी हा राजीनाम पाठवला आहे. कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव आपण भाजपा सोडून राष्ट्रवादी पक्षात प्रवेश केला होता. आता देखील कार्यकर्त्यांच्या सांगण्यानुसार राष्ट्रवादी पक्षाचा राजीनाम देत असून पुढील राजकीय भूमिका हि देखील कार्यकर्त्यांसोबत चर्चा करून ठरवणार असल्याचे यावेळी सुनिता खंडागळे यांनी सांगितले. दरम्यान खंडागळे यांच्या राजीनाम्या नंतर राजकीय वर्तुळात मात्र खळबळ उडाली आहे.




# भविष्यवेध



बुधवार
२४ डिसेंबर २०२५

**मेष**
तुम्ही जे ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न करत आहात ते आज साध्य होऊ शकते. आज तुम्हाला तुमचे लक्ष्य साध्य करण्यासाठी अधिक मेहनत करावी लागेल.

**वृषभ**
काम कितीही कठीण असले तरी एकाग्रता टिकवून ठेवावी लागेल.ऑफिसमध्ये नवीन प्रोजेक्ट मिळेल, ज्या पूर्ण करण्यासाठी तुम्हाला तुमच्या सहकाऱ्यांची मदत मिळेल.

**मिथुन**
मुलांकडून आनंद मिळेल. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला जाईल, तुमची वैयक्तिक समस्या सुटल्यानंतर तुम्हाला मानसिक शांती मिळेल.

**कर्क**
कामाच्या ठिकाणी तुमचे काम चांगले होईल. तुम्हाला काही कामात मदत लागेल, या बाबतीत तुम्हाला एखाद्या चांगल्या मित्राचा सल्ला मिळेल.

**सिंह**
महत्त्वाची कामे सकारात्मक दृष्टिकोनाने पूर्ण करता येतील. व्यावसायिक बाबतीत आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी कठोर परिश्रम करावे लागतील.

**कन्या**
विरोधक तुमचे नुकसान करण्याचा अयशस्वी प्रयत्न करतील. या राशीचे लोक जे सरकारी सेवेत आहेत त्यांना काही उत्कृष्ट असाइनमेंट मिळू शकते.

**तुळ**
कोणतेही नियोजित काम पूर्ण होईल. काही काम करण्याच्या नवीन पद्धतीचा विचार कराल, यामुळे काम वेळेवर आणि सहजतेने पूर्ण होण्यास मदत होईल.

**वृश्चिक**
विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला जाणार आहे. कामाला नवीन स्वरूप देण्यासाठी तुम्हाला काही सर्जनशील क्रियाकलापांमध्ये देखील रस असेल.

**धनु**
विद्यार्थ्यांना यश मिळण्याची शक्यता आहे, परंतु अभ्यासात अजून मेहनत करावी लागेल. तुमच्या कुटुंबातील सदस्यांसोबत चांगला वेळ घालवायला मिळेल,

**मकर**
कौटुंबिक वातावरण आनंददायी राहील. अधिका-यांसोबतच्या व्यवहारात थोडे सावध राहावे. कौटुंबिक कामासाठी तुम्हाला प्रवास करावा लागू शकतो.

**कुंभ**
अशा व्यक्तीला भेटू शकता जो भविष्यात खूप फायदे देऊ शकेल. वेळ वाया न घालवता आणि रखडलेली कामे पुन्हा सुरू केल्यास त्याचा फायदा होऊ शकतो.

**मिन**
जोडीदारासोबत कुठेतरी फिरण्याची योजना बनू शकते. लोकांना त्यांच्या मेहनतीचे सकारात्मक परिणाम मिळतील, ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढेल.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता


महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जल व्यवस्थापन विभाग अंबरनाथ

निविदा सूचना प्रसिध्द करणेबाबत

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, साई विभाग, रोड नं.८२, अंबरनाथ (पूर्व) यांनी खालील कामांसाठी दोन लिफाफा प्रणालीतील सीलबंद निविदा फॉर्म आमंत्रित केले आहे. रिक्त निविदा फॉर्म कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा.ज.व्य.विभाग, अंबरनाथ या कार्यालयात दिनांक २६/१२/२०२५ ते ०२/०१/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत जारी केले जातील. या कामाची सीलबंद निविदा दि.०९/०१/२०२६ रोजी १७.०० वाजेपर्यंत किंवा आधी नमूद केलेल्या कोणत्याही कार्यालयात सादर करता येईल आणि शक्य असल्यास खालील नमूद तारखेला व वेळेवर म.जी.प्रा.च्या सक्षम प्राधिकरणाद्वारे उघडल्या जातील.

| अ. क्र. | निविदा सूचना क्रमांक | कामाचे नांव | निविदेची अंदाजित किंमत (रु.) | इसारा रक्कम (रु.) | सूरक्षा अनामत रक्कम (४%) (रु.) | काम पूर्ण करण्याचा कालावधी | को-या निविदा फॉर्मची किंमत रु. | म.जी.प्रा.कडे नोंदणीकृत कंत्राटदाराचा वर्ग | सिलबंद निविदा स्विकारण्याचा दिनांक व ठिकाण | सिलबंद निविदा उघडण्याचा दिनांक व ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४९ सन २०२५-२६ | M & R to Ambernath Water Works - Replacing and topping up of Filter Media Sand and Repairing work of Filter No.1 at Kharwai WTP | ९८८६७४.०० | ९,८९०.०० | एकूण रक्कम रु.३९५५०/- (अ) प्रारंभिक रक्कम रु.१९७७५/- (ब) चालू देयकातून वसूल होणारी रक्कम रु.१९७७५/- | २ महिने | ५९०.०० | वर्ग-सात (स्थापत्य) Class-6 व त्यावरील (Civil) MJP / PWD / MIDC / CIDCO किंवा MJP सारखे एखादे सरकारी कार्यालयाचे कंत्राटदार | दि. ०९/०१/२०२६ रोजी १७.०० वाजेपर्यंत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, साई विभाग, रोड नं.८२, अंबरनाथ (पूर्व) | दि. १२/०१/२०२६ रोजी १२.०० वाजता. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, रोड नं.८२, अंबरनाथ (पूर्व) |

टिप -
१) सविस्तर निविदा सूचना कार्यकारी अभियंता, एमजेपी विभाग, अंबरनाथच्या सूचना फलकावर पाहिली जाऊ शकते. विनंती केल्यास त्याची प्रत विनामूल्य मिळू शकते.
२) अर्जासह खालील कागदपत्रे जमा करणाऱ्या कंत्राटदारांना रिक्त निविदा फॉर्म देण्यात येईल.
अ) वैध नोंदणी प्रमाणपत्र.
ब) रिक्त निविदा फॉर्मच्या किंमतीची भरपाई
क) जीएसटीसाठी नोंदणी प्रमाणपत्र
३) रिक्त निविदा फॉर्म पोस्टद्वारे पाठविल्या जाणार नाहीत. कोणतीही किंवा सर्व निविदा कोणतीही कारणे न देता नाकारण्याचा अधिकार सक्षम प्राधिकरणाने राखून ठेवला आहे.

(सही/-)
कार्यकारी अभियंता,
म.जी.प्रा.ज.व्य.विभाग, अंबरनाथ.

जा.क्र. जिमाका /ठाणे/जाहि/2025-26/144


# 'द लास्ट नाईट' एकांकिका नाथ पै एकांकिका स्पर्धेत होणार सहभागी




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता/ कल्याण :** अस्तित्व थिएटर कल्याण, तर्फे 'द लास्ट नाईट' ही एकांकिका कणकवली येथे नाथ पै एकांकिका स्पर्धेत सहभागी होणार असून त्याचे लेखक : मनोज गांगुर्डे, दिग्दर्शक : विजय आयरे,नेपथ्य - अमित इंदुलकर, पार्श्वसंगीत- आशुतोष वाघमारे, प्रकाश योजना- विनोद राठोड, व्यवस्थापक आणि रंगभूषा- संजय गावडे, वेशभूषा - मिलिंद ढगे अशी तंत्रज्ञ व सहाय्यकांची नावे आहेत.अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद कल्याण शाखेचे अध्यक्ष रवींद्र सावंत आणि प्रमुख कार्यवाह : शिवाजी शिंदे,सहकार्यवाह : संजय गावडे यांचे यासाठी मोलाचे सहकार्य लाभले. ही स्पर्धा आचरेकर प्रतिष्ठान नाट्यगृह, कणकवली येथे शनिवार दिनांक २७/१२/२०२५ रोजी रात्री ९.०० वाजता असणार आहे. तसेच या स्पर्धेसाठी सर्व स्तरावरून शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.



# मा. आयुक्त मनीषा आव्हाळे यांच्या निर्देशानुसार निवडणूक खर्च निश्चित करण्याबाबतची बैठक

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

आज दि. २३ डिसेंबर, २०२५ रोजी राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचना व मा. आयुक्त श्रीमती मनीषा आव्हाळे यांच्या निर्देशानुसार उमेदवारांच्या निवडणूक खर्चाबाबत विविध बाबींचे दर निश्चित करण्याबाबतची बैठक स्थायी समिती सभागृहात पार पडली.

यावेळी शहरातील विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मुख्य लेखा अधिकारी श्री किरण भिलारे व मुख्य लेखा परीक्षक श्री अभिजित पिसाळ यांनी सर्व उपस्थितांना मार्गदर्शन करून त्यांच्या शंकांचे निरसन केले.

महानगर पालिका निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाच्या खर्च विषयक तरतूदींबाबत सर्वांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी मा. जिल्हाधिकारी महोदय यांनी मान्यता दिलेल्या निवडणूक खर्च विषयक बाबींविषयाच्या दरसूची अंतिम करण्यात आली.

# ठाण्यातील आनंदाश्रम येथे शिवसेनेच्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** महायुतीबाबत अद्यापही बोलणी झाली नसताना दुसरीकडे ठाण्यातील टेंभीनाका येथील आनंद आश्रमात इच्छुकांच्या मुलाखती घेण्यास शिंदे गटाने सुरुवात केली आहे. युतीच्या निर्णयावर अनेक इच्छूकांचे भवितव्य टांगणीला असतानाच आता मुलाखती सुरु झाल्याने अनेकांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.

ठाणे महापालिकेत शिवसेनेची एकहाती सत्ता होती. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडल्यानंतर आता राजकीय समीकरणे बदलून गेली आहेत. राज्यात शिंदे गट आणि भाजपने युती करत सरकार स्थापन केले. त्यामुळे महापालिकेतही युती व्हावी अशी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजपच्या काही पदाधिकाऱ्यांची आहे. असे असले तरी मागील काही वर्षांमध्ये भाजप किंवा शिंदे गटातील महापालिका निवडणूक लढण्यास इच्छूक असलेल्या अनेक पदाधिकाऱ्यांनी, माजी नगरसेवकांनी प्रभाग बांधणीला सुरुवात केली होती.

आता युती होत असल्याने दोन्ही पक्षांमधील काही पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त करण्यास सुरुवात केली आहे. दुसरीकडे दोन्ही पक्षातील वरिष्ठ नेत्यांमध्ये अद्यापही जागावाटपाविषयी देखील चर्चा होत नाही. असे असतानाच, शिंदे गटाने आता आनंद आश्रमातून इच्छूकांच्या मुलाखती घेण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे मुलाखतीसाठी इच्छुकांनी गर्दी केली आहे.

# राष्ट्रीय अल्पसंख्याक हक्क दिवस कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ता राहुल करनाडे यांचे महत्वपूर्ण भाषण

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**



**जालना :** जिल्हाधिकारी कार्यालयात आज राष्ट्रीय अल्पसंख्याक हक्क दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी कार्यालयामार्फत आयोजित या कार्यक्रमात जिल्ह्यातील प्रमुख शासकीय अधिकारी, राज्य अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य आणि विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अल्पसंख्याकांच्या घटनात्मक व कायदेशीर हक्कांबाबत (कलम २९-३०) सविस्तर चर्चा झाली. केंद्र व राज्य शासनाच्या अल्पसंख्याकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांबाबत (मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ, NMDFC, प्रधानमंत्री मुद्रा योजना, PMEGP इ.) माहिती देण्यात आली. सामाजिक कार्यकर्ता राहुल सत्यनारायणजी करनाडे यांनी आपल्या भाषणात दोन प्रमुख मुद्दे मांडले. ते म्हणाले, "मी गेल्या अनेक वर्षांपासून अल्पसंख्याक समुदायांच्या कल्याणासाठी कार्य करत आहे. जालना जिल्ह्यातील अनेक मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, जैन आणि पारशी बंधू-भगिनी लहान उद्योग, किराणा दुकाने, हस्तकला किंवा छोटे व्यवसाय करतात. त्यांची मेहनत कौतुकास्पद आहे, पण आर्थिक अडचणींमुळे ते पुढे वाढू शकत नाहीत." त्यांनी पुढे म्हटले की, "अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज निश्चित मिळते, परंतु जिल्ह्यातील बहुतांश अल्पसंख्याक नागरिक लहान व्यवसाय किंवा बिझनेसमध्ये गुंतलेले आहेत. त्यामुळे मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ (MAMFDC) मार्फत व्यवसायिक कर्ज (टर्म लोन, मायक्रो फायनान्स) अधिक प्रमाणात मिळावे आणि महामंडळाच्या लाभार्थ्यांची संख्या वाढवावी, अशी मागणी त्यांनी केली." दुसरा महत्त्वपूर्ण मुद्दा शैक्षणिक क्षेत्रातील होता. राहुल करनाडे यांनी सांगितले की, "जालना शहरातील विद्यालये आणि महाविद्यालयांमध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणे कठीण होत आहे. अनेकदा सामाजिक कार्यकर्ता किंवा पुढाऱ्याची शिफारस असल्याशिवाय प्रवेश मिळत नाही. ही स्थिती अन्यायकारक आहे. अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेत पारदर्शकता व समान संधी मिळावी यासाठी विशेष समिती गठित करावी, अशी मागणी त्यांनी केली."

कार्यक्रमात उपस्थित प्रमुख व्यक्ती: अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी जिल्हाधिकारी शशीकांत हदगल, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक वाय. ए. पवार, उपशिक्षणाधिकारी वसीम पटेल, तसेच राज्य अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी: मूव्हमेंट फॉर पीस अँड जस्टिस: जिल्हाध्यक्ष इब्राहिम बागवान, सचिव अमजद फारुकी, शहराध्यक्ष रईस शेख, सचिव शकील शेख, लतीफोद्दीन सिद्दीकी जमात-ए-इस्लामी हिंद: शेख इस्माईल सर, अताहमद बख्शी, अध्यक्ष अब्दुल वहीद साहेब ,राहत ग्रुप: अफसर शेख , उर्दू स्कूल: इफ्तिखार सर, नवीद सर, सेवली. कार्यक्रमात अल्पसंख्याक समाजातील नागरिकांना त्यांच्या हक्कांची जाणीव होण्यासोबतच त्यांच्या आर्थिक व शैक्षणिक विकासासाठी उपलब्ध असलेल्या योजनांबाबत सविस्तर चर्चा झाली. राहुल करनाडे यांच्या मागण्यांकडे लक्ष वेधले गेले असून, जिल्हा प्रशासनाकडून यावर लवकरात लवकर उपाययोजना होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय मुरबाडतर्फे राष्ट्रीय सेवा योजना विशेष निवासी शिबीर



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड :** न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय मुरबाड आयोजित राष्ट्रीय सेवा योजना विशेष निवासी शिबिराचे आयोजन मौजे टाकीची वाडी तालुका मुरबाड या ठिकाणी दिनांक 15 डिसेंबर ते 21 डिसेंबर यादरम्यान यशस्वी रीतीने संपन्न झाले आहे . सदर शिबिरामध्ये स्वयंसेवकांनी ग्राम स्वच्छता तसेच वनराई बंधारा बांधून गावामध्ये पथनाट्य , तारफा नृत्य व आदिवासी नृत्य सादर केले .

सदरच्या शिबिरासाठी संस्थेचे अध्यक्ष तथा मुरबाडचे कार्यसम्राट आमदार मा. किसन कथोरे व संस्थेचे सचिव सन्माननीय किसन चौधरी यांची प्रेरणा मिळाली .शिबिरासाठी प्राचार्य मा . .राकेश पाडवी ,संस्थेचे सीईओ मा. निकम, उपमुख्याध्यापक मा . सोनवणे , पर्यवेक्षक मा. भालेराव , स्वामी विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूलचे प्राचार्य मा. बडगुजर ,पालक संपर्क अधिकारी मा. जाधव , फणसे , पर्यवेक्षक मा. भालेराव तसेच मुंबई विभागीय समन्वयक मा. प्रज्ञा अंबर्डे तसेच मुंबई जिल्हा समन्वयक व रायगड जिल्हा समन्वयक मा . कोंडीलकर तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षकांनी व अनेक मान्यवरांनी शिबीरास भेट देऊन स्वयंसेवकांना शुभेच्छा दिल्या . शिबीरासाठी टाकीची वाडी ग्रामस्थांचे खूप मोठे सहकार्य लाभले.

एन . एस . एस . कार्यकम अधिकारी मा. अरुण गोंधळी व सौ नम्रता मोहपे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून कॅम्प यशस्वी केला .

आमदार संजय केळकर आणि निरंजन डावखरे यांच्या उपस्थितीत

# मयुर शिंदेचा भाजपमध्ये प्रवेश

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** मुंबई आणि ठाणे शहरातील विविध गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या गुंड मयुर शिंदे याने मंगळवारी अखेर भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. निवडणुकांच्या तोंडावर भाजपने त्याला पक्षात घेऊन 'पावन' केल्याची चर्चा शहरात रंगली आहे. दिल्लीतील नेत्यांच्या विरोधामुळे मयुरचा पक्ष प्रवेशाचा कार्यक्रम काही दिवसांपुर्वी रद्द करण्यात आला असताना मंगळवारी अचानकपणे भाजपने त्याला पक्षात घेतल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. वरिष्ठ नेत्यांचा विरोध मावळला का, असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.

मुंबई आणि ठाणे शहरात विविध गुन्ह्यांमध्ये गुंड मयुर शिंदेचा सहभाग आहे. त्याच्याविरोधा हत्या, खंडणी, पोलिसाला मारहाणीचा प्रयत्न, हत्येचा प्रयत्न असे विविध गंभीर गुन्हे दाखल आहेत. २०११ मध्ये त्याच्याविरोधात मोक्का कायद्यांतर्गत कारवाई झाली होती. ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांना २०२३ मध्ये धमकी आली होती. या प्रकरणात मयुर शिंदे याला अटक झाली होती. मुंबईतून तडीपार केल्यानंतर त्याने ठाणे गाठले होते. तो ठाण्यातील सावरकरनगर भागात राहत असून येथूनच त्याने २०१७ मध्ये शिवसेनेकडून उमेदवारी मागितली होती. मात्र, तेव्हा त्याला उमेदवारी मिळाली नव्हती. यानंतर त्याने भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर राष्ट्रवादी पक्षात प्रवेश केला होता. दरम्यान, यंदाही त्याने निवडणुक लढविण्याची तयारी सुरू केली असून त्यासाठी त्याने भाजपमध्ये प्रवेश करण्याचे ठरविले होते.

# कोरावळे येथील शेतावरील बेड्यांवर बिबट्याचा हल्ला



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता / मुरबाड :** मुरबाड तालुक्यातील मौजे कोरावळे येथील जैतू धुमाळ रा.कोरावळे यांचे स्वतःचे मालकी क्षेत्रातील शेतावरील बेड्यांमध्ये हिंस्र वन्यप्राण्याने २० डिसेंबर २०२५ रोजी रात्रीचे सुमारास हल्ला करून सहा शेळ्या जागीच ठार केले असून दोन शेळ्या ओढून सोबत घेऊन गेल्याचे निशाण दिसून येत आहे. कोरावळे परिसरात बिबट्याचा वावर मोठ्या प्रमाणात वाढल्याने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे बिबट्याचा वावर वाढल्याने त्याचा तात्काल बंदोबस्त करावा अशी मागणी कोरावळे ग्रामस्थांनी केले आहे.

सदर घटनेमध्ये एकूण ८शेळ्या मृत झाल्या असून त्यापैकी ६ नर व २ मादी आहेत.त्यामुळे .जैतू धुमाळ यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे.

सदर घटनेची माहिती मिळताच वनविभागाच्या अधिकारी यांना माहिती मिळताच वनपरिमंडळ सरळगाव कडील . एन. टी.भांगरे, वनपरिमंडळ अधिकारी सरळगांव , ए. बी. घोलप, वनरक्षक माजगाव, के. एस. मस्के, वनरक्षक सरळगांव, जी. एस.मुसळे वनरक्षक खांडपे व वनमजूर हे वनाधिकारी प्रत्यक्ष स्थळावर येऊन सदर घटनेचा पंचनामा केला आहे सदर मृत शेळ्यांचे पशुवैद्यकीय अधिकारी यांनी शवविच्छेदन केले.

वनाधिकारी यांनी ग्रामस्थांना बिबट्यापासून संरक्षण व बचाव करण्यासंदर्भात सूचना दिल्या आहेत.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज व माझी वसुंधरा अभियान अंतर्गत नावझे येथे वनराई बंधारे उभारणी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता/पालघर :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान व माझी वसुंधरा अभियान 6.0 अंतर्गत पालघर तालुक्यातील नावझे गावात जलसंधारण व पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आला. ग्रामपंचायत नावझे हद्दीत वनराई बंधारे बांधण्यात आले. या वनराई बंधाऱ्यांच्या माध्यमातून पावसाचे पाणी अडवून भूजल पातळी वाढविण्यास मदत होणार असून, शेतीसाठी, पिण्याच्या पाण्यासाठी तसेच पर्यावरण संतुलन राखण्यासाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. यामुळे परिसरातील पाण्याची समस्या कमी होऊन विकासाला चालना मिळणार आहे.



मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान व माझी वसुंधरा अभियान 6.0 च्या उद्दिष्टांनुसार जलसंधारण, पर्यावरण संरक्षण व विकासासाठी ग्रामपंचायत नावझे सातत्याने कार्यरत असल्याचे यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले. या उपक्रमामुळे गावाच्या सर्वांगीण विकासाला हातभार लागेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या उपक्रमासाठी नावझे ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी, गावातील सामाजिक कार्यकर्ते, महिला बचत गटांच्या सदस्य, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या, ग्रामपंचायत कर्मचारी, ग्रामस्थ तसेच मुंबई येथील पाटूकगाला कॉलेजचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावकऱ्यांनी या उपक्रमाचे कौतुक करून समाधान व्यक्त केले.

# ठाणे महापालिकेच्या 9 प्रभागसमितीनिहाय एकूण 1069 नामनिर्देशनपत्रांचे वाटप

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे (22) :** ठाणे महापालिका सार्वत्रिक निवडणूक 2025 साठी आजपासून नामनिर्देशन अर्जाचे वाटप करण्यास सुरूवात झाली. ठाणे महापालिकेच्या 9 प्रभागसमितीतून एकूण 1069 नामनिर्देशन पत्राचे वाटप उमेदवारांना करण्यात आले. माजिवडा मानपाडा प्रभाग समितीअंतर्गत प्रभाग क्रमांक 1,2,3,8 साठी एकूण 157 नामनिर्देशन अर्जाचे वाटप करण्यात आले. वर्तकनगर प्रभागसमिती अंतर्गत 4,5,7 या प्रभागांसाठी एकूण 103 अर्जाचे वाटप करण्यात आले.

लोकमान्यनगर सावरकर प्रभागसमितीअंतर्गत 6, 13,14,15 या प्रभागांसाठी 177 अर्जाचे वाटप करण्यात आले. वागळे प्रभागसमिती अंतर्गत असलेल्या प्रभाग क्रमांक 16,17,18 साठी एकूण 102 नामनिर्देशन अर्जाचे वाटप करण्यात आले. नौपाडा कोपरी प्रभाग समिती अंतर्गत 19,20,21,22 साठी एकूण 113 अर्जाचे वाटप करण्यात आले. उथळसर प्रभाग समिती अंतर्गत 10,11,12 या प्रभागांसाठी एकूण 101 नामनिर्देशन अर्जाचे वाटप करण्यात आले.

कळवा प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्र 9,23,24,25 या प्रभागांसाठी 121 नामनिर्देशन अर्जाचे वाटप करण्यात आले. मुंब्रा प्रभाग समिती अंतर्गत तर 26, 31 या प्रभागासाठी 35, तर 30,32 या प्रभागांसाठी एकूण 36 नामनिर्देशन अर्जाचे वाटप करण्यात आले. दिवा प्रभाग समिती अंतर्गत 27, 28 या प्रभागांसाठी एकूण 78 तर 29,33 प्रभागांसाठी 46 अर्जाचे वाटप करण्यात आले असल्याची माहिती प्रभागसमितीनिहाय नियुक्त करण्यात आलेल्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिली.



ठाणे ■ बुधवार
२४ डिसेंबर २०२५

दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता



# माझे कल्याण शहर – प्रश्नमंजुषा स्पर्धा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता / कल्याण :** छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेले, सांस्कृतिक सामाजिक व ऐतिहासिक वारसा लाभलेले शहर म्हणजे कल्याण शहर. कल्याण शहराला विशिष्ट असे व्यक्तिमत्व आहे. याच कल्याण शहराविषयी आपल्याला बहुविध माहिती असणं ही एक मोठी प्रेरणा ठरते. याच अनुषंगाने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त सार्वजनिक वाचनालय कल्याणने एक आगळी वेगळी स्पर्धा-"माझे कल्याण शहर" प्रश्न मंजुषा स्पर्धा -२०२६ आयोजित केली आहे.

हि स्पर्धा खुल्या गटासाठी आहे. कल्याण शहराविषयी काही प्रश्न विचारण्यात येतील त्याची अचूक उत्तरे देणे आवश्यक आहे. स्पर्धकाला कल्याण शहराविषयी माहिती देणारी दुर्मिळ पुस्तके अभ्यासासाठी मंगळवार दि.२३ डिसेंबर २०२५ पासून वाचनालयात उपलब्ध करून देण्यात येतील. प्रसंगी स्पर्धकांनी छायांकित प्रती काढून घ्याव्यात. स्पर्धा रवि.दि.१८ जाने.२०२६ रोजी वाचनालयाच्या सभागृहात सायं.५. वा.घेण्यात येईल. परीक्षकांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील. मंगळ.दि.१३ जाने २०२६ पर्यंत नावनोंदणी करणे आवश्यक आहे. या स्पर्धेत कल्याण शहरातील नागरिकांनी जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा असे आवाहन वाचनालयाचे सरचिटणीस भिकू बारस्कर यांनी केले आहे. संपर्क क्र.९३२४२७११४६

# जिल्ह्यात विविध ठिकाणी अल्पसंख्यांक हक्क दिवस

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**रायगड :** दि.18 डिसेंबर हा दिवस "अल्पसंख्याक हक्क दिवस" म्हणून साजरा करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत अल्पसंखयाकांसाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबतची माहिती विविध माध्यमांतून अल्पसंख्याकांना दिली जाते. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली (गुरुवार, दि.18 डिसेंबर 2025) रोजी जिल्ह्यातील विविध ठिकाणी अल्पसंख्याक हक्क दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

अल्पसंख्यांक समाजाच्या हक्कांचे संरक्षण, समानता व सन्मान याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने अल्पसंख्यांक हक्क दिन जिल्ह्यात विविध उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. संयुक्त राष्ट्र संघाने 1992 मध्ये अल्पसंख्यांक हक्कांबाबत जाहीर केलेल्या घोषणेनुसार दरवर्षी 18 डिसेंबर रोजी हा दिवस पाळला जातो. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन व संबंधित विभागांच्या वतीने अल्पसंख्यांक समाजातील नागरिकांना त्यांच्या घटनात्मक हक्कांबाबत माहिती देण्यात आली. अल्पसंख्यांक हक्क दिनाच्या निमित्ताने आयोजित या उपक्रमांमुळे नागरिकांमध्ये हक्कांबाबत जागरूकता वाढण्यास मदत होणार असल्याचे प्रशासनाकडून नमूद करण्यात आले

# कल्याणात प्रथमच झालेल्या प्लंबर परिषदेच्या माध्यमातून शास्त्रोक्त रेन वॉटर हार्वेस्टिंगचा जागर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** अनिर्बंध वापरामुळे अतिशय धोकादायक पातळीवर पोहोचलेला भूजलसाठा पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग (पर्जन्य जलसंचय) अत्यंत सिंहाची भूमिका बजावत आहे. मात्र भूजल पातळी दीर्घकालीन टिकून राहण्यासाठी हे रेन वॉटर हार्वेस्टिंग शास्त्रोक्त पद्धतीने होणे याची माहिती होणे हेदेखील तितकेच गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर या क्षेत्रातील तज्ञ संस्था असलेल्या निरेन आणि ग्रीनआर्च यांच्या माध्यमातून कल्याणात प्रथमच प्लंबर परिषद संपन्न झाली. येथील बालक मंदिर संस्थेच्या सभागृहात झालेल्या या परिषदेत कल्याण डोंबिवलीतील 100 हून अधिक प्लंबर (नळ जोडणी-दुरुस्तीकार ) उपस्थित होते.




## निरेन आणि ग्रीनआर्च संस्थांच्या पुढाकाराने झाली परिषद

**ग्रीनआर्च संस्थेचे अरुण सपकाळे यांनी रेन वॉटर हार्वेस्टिंगची शास्त्रोक्त पद्धत, त्यासाठी आवश्यक असणाऱ्या खड्ड्याचा आकार, बोअरवेल या विषयावर सखोल माहिती दिली.**

लोकसंख्येचा झालेला विस्फोट, वाढते शहरीकरण, त्यातून पाण्याचा होणारा अनिर्बंध वापर आणि मोठ्या प्रमाणात पाऊस पडूनही त्याच्या साठवणुकीसाठी होणारे दुर्लक्ष यामुळे भूजल पातळी धोकादायक स्थितीवर येऊन ठेपली आहे. त्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंगद्वारे (पर्जन्य जलसंचय) कशा पद्धतीने आपण ही भूजल पातळी वाढवू शकतो? त्यासाठी असणारी शास्त्रीय पद्धत कोणती ? वाढलेली भूजल पातळी दीर्घकालीन टिकून राहण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना कोणत्या? भूगर्भाची पाणी पातळी वाढण्यासह शाश्वत पाणी पुरवठा उपलब्ध कसा होईल?अशा विविध महत्त्वाच्या विषयांवर या परिषदेत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. ज्यामध्ये ग्रीनआर्च संस्थेचे अरुण सपकाळे यांनी रेन वॉटर हार्वेस्टिंगची शास्त्रोक्त पद्धत, त्यासाठी आवश्यक असणाऱ्या खड्ड्याचा आकार, बोअरवेल या विषयावर सखोल माहिती दिली.

तर निरेन संस्थेचे आकाश वारिया यांनी रेन वॉटर हार्वेस्टिंगसाठी खास बनवण्यात आलेल्या निरेन फिल्टर आणि त्याच्या कार्यपद्धतीबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच शास्त्रोक रेन वॉटर हार्वेस्टिंगमध्ये हे फिल्टर पाण्याचा साठा दीर्घकाळ टिकण्यासाठी कशी आणि किती महत्त्वाची भूमिका बजावते याबाबतही माहिती दिली. यावेळी उपस्थित असलेले कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे अतिरिक्त शहर अभियंता प्रशांत भागवत यांनी या उपक्रमाचे कौतुक करत रेन वॉटर हार्वेस्टिंग ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. तसेच ज्याप्रमाणे आपण आपल्या पुढच्या पिढ्यांसाठी संपत्ती, पैसा, घरादाराची तजवीज करून जातो. त्याप्रमाणेच किंवा त्यापेक्षा अधिक आज पाण्याची बचत करून आपल्या पुढील पिढीपर्यंत ते कसे मिळू शकेल याची तजवीज करण्याची गरजही प्रशांत भागवत यांनी व्यक्त केली.

शास्त्रोक्त रेन वॉटर हार्वेस्टिंग पद्धतीबाबत बहुतांश बांधकाम व्यावसायिकांना माहिती आहे. परंतु खरे पाहिले तर ज्या व्यक्ती म्हणजेच हे प्लंबरच ही कामे करत असतात. त्यामुळे रेन वॉटर हार्वेस्टिंगबाबतच्या या महत्त्वाच्या गोष्टी थेट त्यांच्यापर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने ग्रीनआर्च संस्थेचे संस्थापक अरुण सपकाळे आणि निखिल चौधरी यांच्या पुढाकाराने ही परिषद घेण्यात आली.

# मुरबाड पोलिसांची पुन्हा एकदा धडक कारवाई!

## मुरबाड शहरातील सोनारपाडा येथील जूगार अड्ड्यावर छापा!

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**


**मुरबाड :** डॉ.डी.एस.स्वामी, पोलीस अधीक्षक ठाणे ग्रामीण यांनी ठाणे ग्रामीण जिल्हाच्या कार्यक्षेत्रात अवैध जुगार अड्डे चालवून जुगार खेळणा-र्या विरुध्द कारवाई करणेबाबत आदेशित केल्याने त्या अनुषंगाने दादासो एडके, पोलीस निरीक्षक मुरबाड पोलीस ठाणे यांनी मुरबाड पोलीस ठाण्याचे नेमणूकीतील अधिकारी-अंमलदार यांचे पथक तयार करून त्यांना छुप्या रीतीने जुगार अड्डे चालवून जुगार खेळणार्या विरुध्द कारवाई करणेबाबत मार्गदर्शन करून आदेशित केले. मा.वरिष्ठांनी दिलेल्या सूचना व आदेशाप्रमाणे मुरबाड पोलीस ठाण्यातील पथकाने गोपनीय माहिती प्राप्त करून दि.21/12/2025 रोजी मुरबाड पोलीस ठाण्याचे हद्दीत सोनारपाडा येथे टेम्परिरी शेडमध्ये चालू असलेल्या जुगार अड्डयावर छापा टाकला असता जुगार खेळत असलेल्या 6 व्यक्तींना ताब्यात घेवून जुगार खेळण्याचे साहित्य व 4,900/- रु रोख रक्कमेसह रंगेहाथ पकडून त्यांचेविरुध्द मुरबाड पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र.426/2025 महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधि.कलम 12(अ) प्रमाणे गुन्हा नोंद करून कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस अधीक्षक सो, ठाणे ग्रामीण डॉ.डी. एस.स्वामी व अनमोल मित्तल अपर पोलीस अधीक्षक सो, ठाणे ग्रामीण, उपविभागीय पोलीस अधिकारी सो, मुरबाड विभाग अनिल लाड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक .दादासो एडके, सफौ/हिंदुराव, पोहवा/शिंदे, पो.हवा/राठोड, पोशि/ पारधी, पोशि/काळे या पथकाने कामगिरी केली आहे.

# व्हिजिट माय पोलीस स्टेशन' उपक्रमात कल्याणचे महात्मा फुले पोलीस ठाणे ठरले अव्वल

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** नागरिक आणि पोलीस प्रशासन यांच्यातील संवाद अधिक मजबूत करण्यासह पोलीस प्रशासनाबाबतचे नकारात्मक चित्र दूर करण्याच्या उद्देशाने आयोजित "व्हिजिट माय पोलीस स्टेशन" उपक्रमात कल्याणचे महात्मा फुले पोलीस ठाणे अव्वल ठरले आहे. ठाणे पोलीस आयुक्तालयाअंतर्गत येणाऱ्या 38 पोलीस ठाण्यांपैकी पोलीस उपायुक्त परिमंडळ 3 मधील एमएफसी पोलीस ठाण्याने पहिला क्रमांक पटकावला आहे. या पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक बळीरामसिंग परदेशी यांच्यासह गोपनीय शाखा तसेच पोलीस ठाण्यातील सर्व अधिकारी आणि अंमलदार यांनी नागरिकांशी उत्कृष्ट संवाद साधत पोलीस कार्यपद्धती आणि प्रक्रियेची सखोल माहिती करून दिली. त्याबद्दल या पोलीस ठाण्याला पहिला क्रमांक देऊन गौरवण्यात आले आहे.



महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, ठाणे जिल्हा प्राधिकरण, ठाणे पोलीस आयुक्तालय, ग्लोबल केअर फाउंडेशन आणि नॅशनल सर्व्हिस स्कीम यांच्या संयुक्त विद्यमाने आणि पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या संकल्पनेतून ठाणे शहरातील 38 पोलिस ठाण्यांमध्ये गेल्या महिन्या हा उपक्रम राबविण्यात आला.

नागरिकांमधील पोलिसांविषयीची अनावश्यक भीती दूर करणे, पोलिसांची कार्यपद्धती समजावून देणे, तसेच विविध कायदेशीर जागरूकता निर्माण करणे या हेतूने कल्याणच्या महात्मा फुले पोलीस ठाण्यात आयोजित कार्यक्रमात सर्व वयोगटातील नागरिक, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, शाळा- महाविद्यालयांतील विद्यार्थी, प्रतिष्ठित नागरिक यांच्यासह महिला वर्गाचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. जवळपास अडीच ते तीन हजार नागरिकांनी प्रत्यक्ष महात्मा फुले पोलीस ठाण्यातील प्रत्येक विभागाला भेट देत त्याची कार्यपद्धती, कायदे, ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी सुरू केलेले ज्येष्ठ नागरिकांसाठीचे आधारवड ॲप, पोलीस मित्रॲप, हेल्पलाइनबाबत सखोल माहिती जाणून घेतली.

ज्यामध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक बळीराम सिंग परदेशी, पोलीस उपनिरीक्षक मडके, जानू पवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक भुजबळ या अधिकारी वर्गासह या उपक्रमात विशेष योगदान देणारे गोपनीय शाखेचे पोलीस हवालदार जगदीश महाजन, साहेबराव माळी, भरत धिरडे, पोलीस शिपाई राजेंद्र पानसरे तसेच महात्मा फुले पोलीस ठाण्यातील सर्व अधिकारी आणि पोलिस अंमलदार यांनी नागरिकांशी उत्कृष्टपणे संवाद साधला.

# ज्येष्ठ पत्रकार अरविंद म्हात्रे यांना पत्नीशोक

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण पश्चिम गौरीपाडा येथे राहणारे ज्येष्ठ पत्रकार व कवी लेखक अरविंद म्हात्रे यांच्या पत्नी उर्मिला अरविंद म्हात्रे यांचे अल्पशा आजाराने वयाच्या ५७ वर्षी निधन झाले. त्यांच्या पत्नीच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी-जावई असा परिवार आहे. गौरीपाडा येथील त्यांच्या राहत्या घरापासून अंतिम यात्रा काढण्यात आली. अंत्ययात्रेला



राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व पत्रकार क्षेत्रातील मान्यवर तसेच परिसरातील असंख्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाची बैठक



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण :** राष्ट्रीय ओबीसी शिक्षक संघाची महत्त्वपूर्ण बैठक तुळजापूर येथे उत्साहात पार पडली. या बैठकीत संघटनेच्या बळकटीकरणासाठी आवश्यक असलेल्या विविध संघटनात्मक बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत आढावा घेण्यात आला. ओबीसी शिक्षकांच्या हक्कांसाठी प्रभावीपणे काम करण्यासाठी संघटनेची रचना अधिक मजबूत करण्यावर भर देण्यात आला. आगामी काळातील उपक्रम, सदस्य नोंदणी वाढवणे, तालुका व जिल्हास्तरीय कार्यकारिणी अधिक सक्रिय करणे, तसेच शिक्षकांच्या शैक्षणिक व प्रशासकीय अडचणी शासन दरबारी मांडण्याबाबत चर्चा झाली. यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी संघटनेच्या ध्येयधोरणांची माहिती देत एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले. शिक्षकांच्या समस्या सोडवण्यासाठी संघटना कटिबद्ध असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. या बैठकीला संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठक यशस्वीरीत्या पार पडल्याने संघटनेच्या कार्याला नवचैतन्य मिळाल्याची भावना उपस्थितांमध्ये दिसून आली. सदरची सभा संघटनेचे मार्गदर्शक माजी शिक्षक आमदार कोकण विभाग बाळाराम पाटील ॲड. बी.एल. सगर किल्लारीकर माजी सदस्य राज्य मागासवर्गीय आयोग महाराष्ट्र राज्य,यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपल्ले, सरचिटणीस संतोष भोजने, उपाध्यक्ष सुखदेव भालेकर, धाराशिव जिल्हाध्यक्ष अनंत फुलसुंदर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# अखेर प्रवीण पाटील झाले नगरसेवक जनतेचे ऋण कधीही विसरणार नाही



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण :** पेण नगरपालिका निवडणुकीमध्ये अत्यंत अतितटीची आणि चुरशीच्या झालेल्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक दोन मधून प्रवीण शंकर पाटील यांनी उमेदवारी लढवून सर्वांना चारी मुंड्या चित करत अखेर नागरिकांच्या सहकार्यामुळेच यश संपादन केले आणि पेण मध्ये नगरसेवक झालो याचा मला सार्थ अभिमान आहे अशी बोलकी प्रतिक्रिया आम्ही पेणकर विकास आघाडीचे नवनिर्वाचित नगरसेवक प्रवीण पाटील यांनी व्यक्त केली. या प्रभागामध्ये खासदार आमदार माजी अध्यक्ष जिल्हाध्यक्ष यासह अनेक जण मला हरवण्यासाठी मैदानात उतरले होते मात्र मी या सगळयांना पुरून उरलो आणि जनता जनार्दनांनी मला चांगलं सहकार्य करून मला १०९७ मते देऊन पेण नगरपालिका निवडणूकीत ११८ मतांनी निवडून आणलं याबद्दल सामान्य जनतेचे मी ऋण कधीही विसरणार नाही असेही प्रवीण पाटील यांनी सांगितले.

प्रवीण पाटील हे गेली आठ नऊ वर्ष सर्वसामान्य जनतेच्या न्याय हक्कासाठी सर्वसामान्य जनतेला नागरी सुविधा मिळाव्यात तसेच ज्या ठिकाणी अन्याय होत आहे अशा ठिकाणी त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी ते प्रामाणिकपणे प्रयत्न करत होते आणि आज अखेर त्यांनी केलेल्या कामाची पोच पावती तर मिळालीच आणि करत असलेले श्रम सत्कारणी लागले . प्रवीण पाटलांच्या रूपाने साधेपणाचा आणि सेवाभावाचा प्रामाणिक चेहरा आणि स्वच्छ प्रतिमा असलेले लोकप्रियतेचे उत्तम उदाहरण आहेत . गावातील लग्न, जन्म, मृत्यू किंवा दवाखान्यातील प्रसंग असो ते स्वतः हजर राहून धीर देऊन मदत करतात आणि साथ देतात. एक उच्च शिक्षित तरुण आणि उमदे व्यक्तीमत्व असलेले इंजिनिअर प्रविण पाटील यांना कधीच कसलाही गर्व नाही; निर्व्यसनी, निरागस, शांत आणि मनमिळाऊ स्वभावामुळे ते सर्वांच्या मनात घर करून आहेत. वृद्ध व्यक्तींना वाकून नमस्कार करण्याचे संस्काराचे बालकडू घरातून मिळाल्यामुळे व धार्मिक वृत्ती स्वतःमध्ये कायम जपलेली आहे. असे दांडगा जनसंपर्क, सर्वांना जोडून घेण्याची वृत्ती आणि सतत मदतीसाठी तयार असलेले त्यांचे हसतमुख व्यक्तिमत्त्व यामुळे प्रवीण शंकर पाटील यांना पेणकरांनी दिलेला मदतीचा हात निश्चितच अभिमानास्पद असून भविष्यात पाच वर्षांमध्ये माझ्या मनातल्या ज्या ज्या संकल्पना आहेत त्या सर्व नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि सर्वसामान्य जनतेला दिलेला शब्द पूर्ण करण्यासाठी मी पाच वर्षे प्रामाणिकपणे सेवा करीन असेही प्रवीण पाटील यांनी सांगितले

# साहसी खेळ क्षेत्रातील महिलांचा गौरव

## रोटरी क्लब ऑफ कल्याण आणि माउंटेन स्पोर्ट्स अकॅडमीच्या संयुक्त विद्यमाने उपक्रम

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** 'रोटरी क्लब ऑफ कल्याण' आणि 'माउंटेन स्पोर्ट्स अकॅडमी' यांच्या संयुक्त विद्यमाने, साहसी खेळ आणि समाजसेवा या क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या महिलांच्या सन्मानार्थ एका विशेष सोहळ्याचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. 'नानावटी कलागृह' गोरेगाव येथे संपन्न झालेल्या या कार्यक्रमात 'नवदुर्गा २०२६' या विशेष डेस्कटॉप कॅलेंडरचे प्रकाशन दिमाखात पार पडले.



## नवदुर्गा २०२६' या विशेष डेस्कटॉप कॅलेंडरचे प्रकाशन

या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे, दिग्गज गिर्यारोहक आणि राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या के. सरस्वती आणि रोटरी क्लब ऑफ कल्याणच्या अध्यक्षा रोटेरियन रुईता सपकाळे यांच्या हस्ते हे प्रकाशन करण्यात आले. यावेळी साहसी खेळ क्षेत्रातील १२ कर्तृत्ववान महिलांचा विशेष सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. याप्रसंगी बोलताना के. सरस्वती यांनी या अभिनव उपक्रमाचे मनापासून अभिनंदन केले. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "या कॅलेंडरमध्ये स्थान मिळवलेल्या या १२ महिलांनी अत्यंत कठीण परिस्थितीत आपले ध्येय गाठले आहे. समाजातील सर्वच महिलांनी या कर्तृत्ववान महिलांकडून प्रेरणा घ्यायला हवी आणि स्वतःच्या स्वप्नांचा पाठलाग करायला हवा.

'नवदुर्गा २०२६' या उपक्रमाचा मुख्य उद्देश हा आहे की, ज्या महिलांनी समाजातील पारंपारिक चौकटी मोडून साहसी क्षेत्रात आपले स्थान निर्माण केले आहे, त्यांच्या कार्याची दखल घेणे आणि त्यांच्या यशोगाथा जनसामान्यांपर्यंत पोहोचवून येणाऱ्या पिढीला प्रेरणा देणे. "साहस हा केवळ खेळ नसून महिला निर्भय आणि नियमांना छेद देणाऱ्या आहेत, हे सिद्ध करणारे ते एक विधान आहे," या भावनेतून हे कॅलेंडर साकारण्यात आले आहे. या कॅलेंडरमध्ये नेहा पंचमिया, प्राजक्ता घोडे, डॉ. प्रीती पटेल, डॉ. मनीषा वाघमारे, कस्तुरी सावेकर, वेदांगी कुलकर्णी, कल्पना, सिद्धी मणेरीकर, हर्षाली वर्तक, तन्वी देवरे, सायली महारराव आणि प्रियांका मोहिते या १२ प्रेरणादायी महिला यांचा समवेश आहे. याप्रसंगी रोटेरियन अरुण सपकाळे, रोटेरियन निखिल चौधरी आणि रोटेरियन सचिन पितांबरे यांची प्रमुख उपस्थिती होती. रोटरी क्लब ऑफ कल्याण ही एक जागतिक सामाजिक संस्था असून महिला सक्षमीकरणासाठी ती सदैव अग्रेसर असते. "महिलांच्या कर्तृत्वाला सलाम करणे आणि त्यांना पाठबळ देणे हे आमचे कर्तव्य आहे," असे मत रोटे. रुईता सपकाळे यांनी व्यक्त केले. यासारखे महिला सक्षमीकरणाचे उपक्रम रोटरी क्लब भविष्यातही राबवत राहील, असा विश्वास त्यांनी दिला. या संपूर्ण कार्यक्रमाचे नेटके आयोजन 'माउंटेन स्पोर्ट्स अकॅडमी'चे संस्थापक नंदू चव्हाण यांनी केले होते.

नियमित वाचा
दै. ठाणे जीवनदीप वार्ता

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024